सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,भंडारा,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

दुरध्वनी क्र.01784-251222 E-Mail- ddmobnd@gmail.com

**वाचा :**१ आपत्ती व्यवस्थापनकायदा, २००५ चे कलम३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना२०२०/प्रा.क्र.५८/ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**
**क्र.कक्ष/जिकाभं/जि.आ.व्य.अ./**339**/२०२०**
**दिनांक :-** 23**/०३/२०२०**

**आदेश**

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर्भ क्र. ०२ मधील परिच्छेद ०३ नुसार कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणने व प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

सदर कायदा भंडारा जिल्ह्यात लागु करण्यात येत असुन करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील **सर्व धर्म व जातीचे सर्व देवस्थान, मंदिर, धार्मीक संस्था, सार्वजनिक ठिकाणे** साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ अन्वये दिनांक २४ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद करण्यात यावे. तरी निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली माधिल तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तरी या आदेशावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, व याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

Pradip

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,भंडारा**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**

**प्रती -**१. सर्व विभाग प्रमुख / संस्था प्रमुख------------------------------------------------------------ जिल्हा भंडारा

**प्रत-**१.मा. विभागीयआयुक्त, नागपुर विभाग नागपुर यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner